लोकमत

# न्यू आर्टस् संघ विजेता, आरबीएनबी उपविजेता

## सोनई महाविद्यालय : ताईसाहेब कदम राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोनई** : सोनई (ता. नेवासा) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अयोजित ताईसाहेब कदम राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत नगरचा न्यू आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स संघ विजेता ठरला. श्रीरामपूर येथील आर. बी. एन. बी. महाविद्यालय संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेचे उद्‌घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनील नरवडे यांच्या हस्ते झाले. स्वागत प्राचार्य डॉ. शंकर लावरे यांनी केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. ज्ञानदेव झिने यांनी केले.

स्पर्धेसाठी 'भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक मंदीच्या उंबरठ्यावर उभी आहे/नाही' हा विषय ठेवण्यात आला होता. न्यू आर्टस महाविद्यालयाच्या अनिकेत डमाळे व श्रीराज माने यांचा पाच हजार रुपये, प्रशस्तीपत्र व करंडक देऊन सन्मान करण्यात आला. दुसरे बक्षीस श्रीरामपूर येथील आरबीएनबी महाविद्यालयाच्या आकाश मोरगे व राहुल गुडधे यांना देण्यात आले. तिसरे बक्षीस आदिनाथनगर (पाथर्डी) येथील राजळे महाविद्यालयाच्या राहुल दारकुंडे व भारती देशमुख देण्यात आले.

पुनम नांगरे, अश्विनी लोंखडे, ओंकार दरंदले, चैतन्य सोनवणे, शिवानी भिसे, प्राजक्ता गायके यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. परिक्षक म्हणून प्रा. सुभाष देशमुख व प्रा. रामकिसन शिंदे यांनी काम पाहिले. प्रा. डॉ. निवृत्ती मिसाळ, प्रा. डॉ. संभाजी दराडे, डॉ. शिवाजी दरंदले, डॉ. अविनाश साळवे आदी उपस्थित होते. डॉ. मच्छिंद्र वर्पे यांनी आभार मानले.